# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

## प्रेस नोट

**दिनांक २५/०६/२०२२ (शनिवार)**

**(दुपार)**

---

### विनयभंग

**पो.स्टे. सावनेर** :– दिनांक १७/११/२०२१ ते दिनांक २४/०६/२०२१ चे १४.०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय १४ वर्ष हि मुलगी आपले घरी हजर असतांना तिचे लहान भाउ टिव्ही पाहत बसले होते त्यावेळी आरोपी नामे– गणेश उर्फ जरैक्या सुरेश चौधरी वय ४२ वर्ष, रा. टाकळी भंसाळी ता. सावनेर हा शेतामधुन घरी परत आला व आंघोळीला बसला व नमुद फिर्यादीला पाहुन लाज वाटेल असे हावभाव करू लागला. तसेच आरोपीने तिचे मनास लज्जा उत्पन्न होईल असे कृत्य करून तिचा विनयभंग केला व अश्लिील शब्दात शिवीगाळ करून मारण्याची धमकी दिली.

. सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम ३५४, ३५४(ए), ३२३, ५०६, २९४ भादंवी. सहकलम ८, १२ अल्पयीन न्याय कायदा २०१५ कायद्यान्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीला अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास मपोउपनि गेडाम मो.कं. ७५५८५०९३४९ या करीत आहे.

### जबरी संभोग

**पो.स्टे. वेलतुर** :– दिनांक ०१/०३/२०२२ ते दिनांक २३/०६/२०२२ चे १०:०० वा. चे सुमारास वय १७ वर्षीय विधी संघर्षग्रस्त बालक हा अल्पवयीन फिर्यादी/पीडिता वय १६ वर्ष हिच्या घरी तीचे आईवडील हजर नसतांना जावून तीच्या सोबत वारंवार जबरी संभोग करून सदर पीडित ही तीन महीन्याची गरोदर होण्यास कारणीभूत ठरला. पीडिता हिचे बयाना वरून व पोलीस स्टेशन कळमना नागपूर शहर येथे पीडित हिच्या एम.एल.सी कागदपत्रावरून सदर विधी संघर्ष बालका विरूद्ध गुन्हा नोंद करून तपासात घेतला.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. वेलतुर येथे आरोपीविरुध्द कलम ३७६(२)(एन), ३७६(३) भादंवि. सहकलम ४, ६ बाल लैगींक अत्याचार प्रतिबंधक कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. विधी संघर्षग्रस्त बालक यास ताब्यात घेण्यात आले असून गुन्हयाचा पुढील तपास मसपोनी मंडवले मो.क्र. ९७६३२२३४५४८ या करीत आहे.

### पळवून नेणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल

**पो.स्टे. कुही** – दिनांक २३/०६/२०२२ चे ०७.३० वा. ते १५.०० वा. चे सुमारास पो.स्टे. कुही हद्दीत फिर्यादीयांची १५ वर्षीय अल्पवयीन मुलगी ही शाळेला सुट्टी असल्याने घरीच हजर होती. फिर्यादी व फिर्यादीचे पती हे शेतात शेतमजुरीचे काम करण्यासाठी गेले होते. घरी आल्यानंतर त्यांना त्यांची मुलगी दिसली नाही. त्यादरम्यान अज्ञात आरोपीने फिर्यादीच्या मुलीला फिर्यादीच्या कायदेशीर रखवालीतून फुस लावून पळवून नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरुन पो.स्टे. कुही येथे आरोपीविरुध्द कलम ३६३ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक देवीदास ठमके मो.क्र. ८७८८५५३१३९ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**